॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ९१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

✲ सुविचार ✲
यश त्यांचं असतं, जे प्रयत्न कधीच थांबवत नाहीत.

# भारताचा सुवर्ण षटकार, बॉक्सिंग, तिरंदाजी, कुस्तीत डंका

## भारताची उत्तुंग झेप । १६ सुवर्ण पदकांसह भारत टॉप फाईव्हमध्ये दाखल

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

आशियाई स्पर्धेत शुक्रवार भारतासाठी गोल्डन डे ठरला. भारतीय क्रीडापटूंनी आज सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करीत ६ सुवर्ण पदकांसह एकूण १० पदकांची कमाई केली. भारतीय क्रीडापटूंच्या दमदार कामगिरीमुळे ७६ पदकांसह भारत टॉप फाईव्हमध्ये पोहोचला. ३ बॉक्सिंग, १ तिरंदाजी, १ कुस्ती आणि १ महिला हॉकी संघ अशा ६ पदकांची कमाई केली. आजच्या सुवर्ण षटकारामुळे भारताच्या सुवर्ण पदकांची संख्या १६ वर पोहोचली. आज भारताने ६ सुवर्ण, २ कांस्य आणि २ रौप्य पदकांसह १० पदकांची कमाई केली.

जपानमध्ये सुरू असलेल्या २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला. बॉक्सिंगमध्ये भारताच्या सुवर्णमुकुटात आणखी भर पडली. महिलांच्या ७५ किलो वजनी गटात लवलीना बोरगोहेन आणि ६५ किलो वजनी गटात परवीन हुड्डा यांनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरले तर पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात अंकुश पंघालने सुवर्ण पंच मारत इतिहास रचला. आज भारताने एकट्या बॉक्सिंगमध्येच ३ सुवर्ण पदक पटकावले. परवीन हुड्डाने महिलांच्या ६५ किलो वजनी गटातील अंतिम सामन्यात चिनी तैपेईच्या चेन निएन चिनचा ३-२ असा पराभव केला. परवीन हुड्डा ही आशियाई क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक पटकावणारी भारतातील तिसरी महिला बॉक्सर ठरली.

तिच्यापूर्वी २०१४ मध्ये दिग्गज मुक्केबाज मेरी कोमने आणि याच चालू स्पर्धेत लवलिना बोरगोहेनने सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. एकाच दिवशी अवघ्या मिनिटाच्या अंतरात लवलिना आणि परवीनने सुवर्ण कमाई केली. यासोबतच कुस्तीत पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात भारताच्या सुजीत कलकलने अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत त्याने ही सुवर्ण कमाई केली. याशिवाय तिरंदाजी आणि हॉकी स्पर्धे तही भारताने सुवर्ण पदक जिंकले.

यासोबतच सुवर्ण पदक मिळवून देणाऱ्या कुमकुम मोहाडसह धीरज बोम्मदेवरा या तिरंदाजीपटू जोडीने मिक्स्ड टीम रिकर्व्हमध्ये रौप्य पदक आणि धीरज बोम्मदेवरा, नीरज चौहान, यशदीप भोगे या पुरुष तिरंदाजपटूंनीही रौप्य पदक मिळविले. याशिवाय सेलिंग (महिला डिंघी) स्पर्धेत भारताच्या नेत्रा कुमानने आणि सेपाकतकरा (क्काड्रेट) च्या भारतीय पुरुष संघानेही कांस्य पदक पटकावले.



### तिरंदाजीत महिलांची सुवर्णकमाई

बॉक्सिंग सोबतच तिरंदाजीतही भारतीय महिला संघाने इतिहास रचला. भारतीय महिला तिरंदाजी संघाने दक्षिण कोरियाचे वर्चस्व संपवत आशियाई क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच मिक्स्ड रिकर्व्ह संघ आणि पुरुष रिकर्व्ह संघानेही चमकदार कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले. रिकर्व्ह तिरंदाजीच्या महिला सांघिक स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकल्यानंतर कुमकुम मोहोडने धीरज बोम्मादेवराच्या साथीने अचूक नेमबाजी साधत भारताला सुवर्ण पटकावून दिले. कुमकुम मोहाडे ही अमरावती जिल्ह्यातील क्रीडापटू आहे.

### भारतीय महिला हॉकी संघाची सुवर्ण भरारी

भारताच्या महिला हॉकी संघाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत इतिहास रचला. अंतिम सामन्यात भारतीय संघाने चीनला १-० ने पराभूत करून सुवर्णपदक पटकावले. यासोबतच भारतीय महिला हॉकी संघाने २०२८ च्या ऑलिम्पिकसाठीही पात्रता मिळवली. १९८२ नंतर प्रथमच भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. भारतीय महिलांनी आशियाई खेळांमधील ४४ वर्षांचा सुवर्णपदकांचा दुष्काळ संपवला.

### पदक जिंकणारे भारतीय खेळाडू

■ **सुवर्ण पदक** – तिरंदाजी : अंकिता भकत, कुमकुम मोहोडे, कीर्ति शर्मा (महिला टीम रिकर्व्ह)
■ लवलीना बोरगोहेन : बॉक्सिंग (महिला ७५ किलो)
■ परवीन हुड्डा : बॉक्सिंग (महिला ६५ किलो)
■ अंकुश पंघाल : बॉक्सिंग (पुरुष ८० किलो)
■ सुजीत कलकल : कुस्ती (पुरुष ६५ किलो)
■ भारतीय महिला संघ : हॉकी

**रौप्यपदक**
■ कुमकुम मोहोद, धीरज बोम्मदेवरा : तिरंदाजी (मिक्स्ड टीम रिकर्व्ह)
■ धीरज बोम्मदेवरा, नीरज चौहान, यशदीप भोगे : तिरंदाजी (पुरुष टीम)

**कांस्य पदक**
■ नेत्रा कुमानन : सेलिंग (महिला डिंघी)
■ भारतीय पुरुष संघ : सेपाकतकरा (क्काड्रेट) – कांस्यपदक

## SPOT NEWS

### तुफान गर्दीत शिवाजी पार्कवर सीजेपीचे आंदोलन सुरू

**● मुंबई –** केंद्रीय निवडणूक आयोगात अंतर्गत मतभेद असल्याची माहिती समोर आल्यानंतर देशभरात खळबळ उडाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी करत देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर शुक्रवार दि. २ ऑक्टोबर सीजेपीच्यावतीने मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर जेलभरो आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला राज्यभरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली असून निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. दुसरीकडे 'सीजेपी'च्या या जेलभरो आंदोलनाविरोधात झेन नेक्स्टचे आंदोलन सुरू आहे. त्यामुळे मुंबईत चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. सीजेपीच्या या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. त्यामुळे हे आंदोलन होणार की नाही? असा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, सीजेपीचे हे आंदोलन सुरू झाले आहे.

### तमिळनाडूत महामार्गाच्या फलकावर हिंदी लिहिल्याने २ अधिकारी निलंबित

**● चेन्नई –** तमिळनाडू सरकारने शुक्रवारी राष्ट्रीय महामार्गाच्या फलकांवर हिंदी लिहिल्याप्रकरणी दोन सहायक अभियंत्यांना निलंबित केले. हे प्रकरण तुतुकुडी जिल्ह्यातील सत्तानकुलम-नाझरेथ राज्य महामार्गाशी संबंधित आहे. येथे नव्या फलकांवर तमिळ आणि इंग्रजीसोबतच शहरांची नावे हिंदीतही लिहिण्यात आली होती. तमिळनाडू सरकारच्या मते, हे राज्याच्या द्विभाषिक धोरणाचे उल्लंघन आहे. हिंदी मजकूर हटवण्यासोबतच दोन्ही अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय कारवाई सुरू करण्यात आली आहे. तामिळनाडूमध्ये दीर्घकाळापासून द्विभाषिक सूत्राचे धोरण लागू आहे. याअंतर्गत सरकारी कामकाज आणि शिक्षणात तमिळ व इंग्रजीचा वापर केला जातो. राज्य सरकार हिंदीचा समावेश असलेल्या त्रिभाषिक धोरणाला विरोध करत आले आहे. तामिळनाडूच्या भाषा धोरणाचा आधार १९५६ चा तामिळनाडू अधिकृत भाषा अधिनियम आहे, ज्यामध्ये तमिळला राज्याची अधिकृत भाषा बनवण्यात आले. १९६५ च्या हिंदीविरोधी आंदोलनानंतर १९६८ मध्ये तत्कालीन मद्रास विधानसभेने त्रिभाषिक सूत्र नाकारून तमिळ आणि इंग्रजीला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला.

# एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली

**● मुंबई । वीरभूमी –**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना आश्वासन दिले होते. त्यांनी शब्द दिलेला तो पाळला. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून परिपत्रक काढण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदलीचे आश्वासन दिले होते. महेंद्र हरपाळकर यांच्यावर संभाजी ब्रिगेडने शाईफेक केली होती. तीन दिवसांपूर्वी एमपीएससीच्या विध्यार्थांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यावेळी सकारात्मक चर्चा पार पडलेली. एमपीएससीचे सचिव महेंद्र होरपाळकर यांची बदली होणार, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना दिले होते. त्यानुसार हरपाळकरांची बदली झाली आहे.

मागच्या महिन्यात नवी मुंबईत संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळ फासले होते. एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांचा राजीनामा घ्यावा अशी एमपीएससीच्या परीक्षार्थींची मागणी होती. कारण पेपर फुटीचे हे प्रकरण त्यांच्या कार्यकाळात घडले आहे. पेपर फुटीमध्ये एमपीएससीमध्ये काम करणाऱ्या लोकांचा सहभाग असल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. अशा पद्धतीची लोकं एमपीएससीवर नसवीत अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे.

औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर फुटल्यापासून एमपीएससी विद्यार्थ्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे रस्त्यावर उतरुन एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासण्याच्या या प्रकाराशी खासदार सुप्रिया सुळे यांनी असहमती व्यक्त केली होती. हे करणे योग्य नाही. तोंडाला काळं फासून प्रश्न सुटत नाही असे सुप्रिया सुळे म्हणालेल्या.

# ओळख पटवून वगळलेल्या मतदारांची नव्याने नोंद

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहिमेदरम्यान (एसआयआर) १३ कोटीहून अधिक मतदारांची नावे प्रारुप मसुदा मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. याविरोधात इंडिया आघाडीने देशभरात आंदोलनाची घोषणा केली आहे. याचा धसका घेत केंद्रीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे.

एसआयआरची प्रक्रिया पूर्ण झालेल्या २० राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादीतून वगळलेल्या पात्र मतदारांचा शोध घेण्यासाठी विशेष अभियान राबविण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. या अभियानांतर्गत वगळलेल्या मतदारांची ओळख पटवून त्यांना पुन्हा मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी दिली जाणार आहे. त्यासाठी घरोघरी जाऊन पडताळणी करण्यासह नव्याने नोंदणीसाठीचा अर्ज भरून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे कोट्यवधी वैध मतदारांना दिलासा मिळाला आहे.

निवडणूक आयोगाने २९ सप्टेंबर रोजी सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिका-यांना पत्र पाठवून हे निर्देश दिले. गुरुवारी झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्समध्येही या अभियानाबाबत सूचना देण्यात आल्या. मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी या मोहिमेची अंमलबजावणी करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. एसआयआर प्रक्रियेदरम्यान प्रारूप मसुदा मतदार याद्यांमधून सुमारे १३ कोटी नावे वगळण्यात आल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रक्रियेत पात्र मतदारांची नावेही वगळली गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मतदार यादी तयार करण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. याविरोधात विरोधकांनीही सातत्याने आवाज उठवत एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याची आणि नव्याने राबवण्याची मागणी केली होती. तसेच या विरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची घोषणाही करण्यात आली.

# कबड्डी मध्ये सलग दुसऱ्यांदा पटकावले सुवर्णपदक!

## जिल्ह्याचे भूमिपुत्र अस्लम इनामदार यांचा पालकमंत्री विखे पाटील यांनी केला सत्कार

**● शिर्डी । वीरभूमी –**

आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळात दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळविलेल्या अहिल्यानगरचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याची खेळातील कारकीर्द सुवर्णविजयी आणि सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभानचा भूमिपुत्र अस्लम इनामदार याने आशियाई क्रीडा स्पर्धेत कबड्डी संघामध्ये प्रतिनिधित्व करून सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावण्याचा मान मिळविला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अस्लम इनामदार याचा लोणी येथे सत्कार करून त्याचे विशेष अभिनंदन केले.

या प्रसंगी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह अस्लमचे नातेवाईक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर क्रीडा क्षेत्रात अस्लम इनामदार आणि त्याच्या संघाने भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला. हे यश अहिल्यानगरच्या क्रीडा संस्कृतीचे, त्याच्या कुटुंबीयांचे आणि प्रशिक्षकांचे आहे. अहिल्यानगरचा भूमिपुत्र आशियाच्या मैदानावर इतिहास घडवतो, ही सर्वांच्या दृष्टीने अभिमानास्पद घटना आहे, असे विखे पाटील म्हणाले.

ग्रामीण भागातील खेळाडू आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने नावलौकिक मिळवत असल्याचे सांगून, यापूर्वी अस्लमला प्रथम सुवर्णपदक मिळाले तेव्हा टाकळीभान येथे त्याच्या नागरी सत्कार समारंभास आपण आवर्जून उपस्थित होतो, अशी आठवण त्यांनी सांगितली. अस्लमचे यश हे जिल्ह्यातील खेळाडूंसाठी अतिशय प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनेक खेळाडू जिल्ह्यातून विविध स्पर्धांत सहभागी होत आहेत. शहर आणि ग्रामीण खेळाडूंमधील दरी आता कमी होत आहे. योग्य संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळाले तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू देशाचे नाव उज्वल करू शकतात, हा आत्मविश्वास अस्लम इनामदार याच्या यशाने सर्वांना दिला आहे, असेही मंत्री विखे पाटील म्हणाले.



## SPOT NEWS

### ऊस दराच्या प्रश्नावर ५ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

ऊस गाळप हंगाम २०२६-२७ सुरू करण्यापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. शिवसेना युवा नेते तथा ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजीत पोटे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर ही बैठक होत असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य साखर आयुक्त यांच्या आदेशानुसार आणि जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीला शेतकरी प्रतिनिधी, साखर सहसंचालक, पोलीस अधीक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वैधमापनशास्त्र विभागाचे अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेष लेखापरीक्षक तसेच अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सहकारी व खासगी साखर कारखान्यांचे चेअरमन, कार्यकारी संचालक व जनरल मॅनेजर उपस्थित राहणार आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला प्रति टन ५ हजार रुपये दर जाहीर करावा; अन्यथा ऊस पिकाला प्रति टन १ हजार रुपये अनुदान देऊनच साखर कारखाने सुरू करावेत, अशी मागणी अभिजीत पोटे यांनी केली आहे. कमी पर्जन्यमानामुळे यंदा अनेक भागांत ऊस पिकाची अपेक्षित वाढ झालेली नाही. अशा परिस्थितीत ऑक्टोबरमध्ये गाळप हंगाम सुरू केल्यास अपरिपक्व ऊस कारखान्यांकडे जाण्याची शक्यता असून त्यामुळे साखर उतारा कमी होऊन शेतकऱ्यांना कमी दर मिळण्याची शक्यता असल्याचे पोटे यांनी म्हटले आहे. थंडीच्या कालावधीत उसाची वाढ तसेच साखर तयार होण्याची प्रक्रिया वेगाने होत असल्याने २०२६-२७ चा गाळप हंगाम नोव्हेंबरअखेर किंवा डिसेंबरमध्ये सुरू करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. मात्र, साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाला ऑक्टोबरमध्येच कारखाने सुरू करायचे असतील, तर शेतकऱ्यांच्या संभाव्य नुकसानीची भरपाई म्हणून प्रतिटन १ हजार रुपये अनुदान द्यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### लायन्स क्लबच्या सेवाभावी उपक्रमांनी गांधी जयंती; सेवा सप्ताहास प्रारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने विविध सेवाभावी उपक्रम राबवून सेवा सप्ताहास उत्साहात प्रारंभ करण्यात आला. वाडियापार्क क्रीडा संकुल येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सेवा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माळीवाडा येथील महात्मा फुले छात्रालयातील विद्यार्थ्यांसाठी फॅन भेट देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी सकाळी चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजातील गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गांधी जयंतीनिमित्त सेवा सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुमित लोढा यांच्या वतीने महात्मा फुले छात्रालयास फॅन देण्यात आला. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिष हरवाणी, खजिनदार विजय कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख किरण भंडारी, धनंजय भंडारे, सुमित लोढा, सुनील छाजेड, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरन वधवा, पूर्णाक्षी शाह, सुरेश खामकर तसेच महात्मा फुले वसतिगृहाचे गणेश कोरडे यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. अध्यक्ष हरजितसिंह वधवा यांनी सांगितले की, लायन्स इंटरनॅशनलच्या प्रणालीप्रमाणे २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान जगभरात सेवा सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत.

# धर्मवीरगडावर दुर्मिळ आत्मबलिदान वीरगळ

## श्रीगोंदा तालुक्यातील एकमेव वीरगळ | शूरवीराच्या आत्मबलिदानाची गाथा शिळेवर कोरलेली

■ **विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी -**

स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनांचे साक्षीदार असलेल्या पेडगावच्या धर्मवीरगडावर आत्मबलिदानाची दुर्मिळ वीरगळ आढळून आली आहे. भीमा नदीच्या काठावरील या ऐतिहासिक किल्ल्यातील प्राचीन रामेश्वर मंदिर परिसरात असलेली ही वीरगळ श्रीगोंदा तालुक्यातील अशा स्वरूपाची एकमेव असल्याचे सांगितले जाते. या शिळेच्या माध्यमातून तत्कालीन धार्मिक श्रद्धा, समाजजीवन आणि आत्मबलिदानाच्या परंपरेचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भ समोर आला आहे.



धर्मवीरगडावर चालुक्य-यादवकालीन मंदिरांचे अवशेष, अनेक वीरगळ आणि सतीशिळा आढळतात. याच ऐतिहासिक वारशात आत्मबलिदान निदर्शक वीरगळ विशेष लक्ष वेधून घेते. एखाद्या धार्मिक कार्यासाठी, मंदिरनिर्मितीसाठी, राज्याच्या कल्याणासाठी किंवा समाजावरील संकट दूर करण्यासाठी स्वतःच्या प्राणांचे अर्पण करणाऱ्या शूरवीराच्या स्मरणार्थ अशा वीरगळ उभारल्या जात असत, अशी ऐतिहासिक परंपरेची माहिती आहे.

प्राचीन काळात नवस, प्रतिज्ञा, शपथ किंवा पण पूर्ण करण्यासाठी देवतेला प्रिय वस्तू अर्पण करण्याची परंपरा होती. काही ऐतिहासिक संदर्भांनुसार, राजाला विजय मिळावा, परकीय आक्रमणाचे संकट दूर व्हावे, राज्यात चांगला पाऊस पडावा, रोगराई व दुष्काळाचे निवारण व्हावे किंवा गावाचे कल्याण व्हावे, अशा हेतूंनी आत्मबलिदानाच्या प्रतिज्ञा केल्या जात असत.

अशा बलिदानांना तत्कालीन समाजात धार्मिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त होत असे. बलिदान दिलेल्या व्यक्तीच्या स्मरणार्थ ग्रामस्थांकडून स्मारकशिळा किंवा वीरगळ उभारली जात असे. त्यामुळे वीरगळ केवळ युद्धात धारातीर्थी पडलेल्या योद्ध्यांच्या स्मृती जपणाऱ्या नसून धार्मिक श्रद्धेतून प्राणार्पण करणाऱ्या व्यक्तींच्या स्मरणाचेही ऐतिहासिक साधन आहेत.

> पेडगाव येथील किल्ले धर्मवीरगडावरील रामेश्वर मंदिर परिसरातील आत्मबलिदान विरगळ आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या किल्ले धर्मवीरगड येथील भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारा प्रसंग हे दोन्ही वेगवेगळ्या कालखंडातील आहेत. याबाबत राज्य पुरातन विभागाने सुद्धा दुजोरा दिला आहे.
>
> **- राजेश इंगळे,** अध्यक्ष, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन

धर्मवीरगडावरील या आत्मबलिदान वीरगळीत तत्कालीन धार्मिक कल्पनांचे दर्शन घडते. वीराच्या बलिदानानंतर त्याला स्वर्गप्राप्ती होते, स्वर्गातून अप्सरा त्याला घेऊन जातात आणि तो आपल्या आराध्य देवतेची पूजा करतो, अशा संकल्पना वीरगळीत शिल्परूपाने मांडलेल्या असल्याचे अभ्यासक सांगतात. या प्रतिमा तत्कालीन समाजातील पुण्य, मोक्ष आणि स्वर्गप्राप्तीविषयीच्या श्रद्धांचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

वीरगळ ही त्या काळातील समाजाची मानसिकता, धार्मिक विचारधारा आणि स्मृतिपरंपरा समजून घेण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक साधन आहे. धर्मवीरगडावरील ही दुर्मिळ वीरगळ त्यामुळे केवळ एक शिल्प न राहता तत्कालीन सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासाचा मूक साक्षीदार ठरते.

स्वतःचा जीव अर्पण करणे ही सामान्य गोष्ट नाही. त्यासाठी आत्मबल आणि निष्ठा आवश्यक मानली जात असे. अशा व्यक्तींचे स्मरण व्हावे आणि त्यांच्या बलिदानाची आठवण पुढील पिढ्यांना राहावी, या भावनेतून ग्रामस्थ स्मारकशिळा उभारत असत. अशा वीरगळ दुर्मिळ असून त्या इतिहासाच्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण आहेत, अशी माहिती वीरगळ अभ्यासक अनिल दुधाने यांनी दिली.

या दुर्मिळ आत्मबलिदान वीरगळाचा शोध व संशोधन शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांच्याशी संबंधित असून, तिच्याविषयीची माहिती आणि ऐतिहासिक संदर्भ अनिल दुधाने लिखित 'इतिहासाचे मूक साक्षीदार : वीरगळ व सतीशिळा' या संदर्भग्रंथातून घेण्यात आले आहेत.

धर्मवीरगडावरील या वीरगळाच्या माध्यमातून श्रीगोंदा तालुक्याचा ऐतिहासिक वैभवाचा एक महत्त्वाचा पैलू उजेडात आला आहे. अशा ऐतिहासिक शिल्पांचे जतन, संवर्धन आणि शास्त्रीय अभ्यास झाल्यास परिसराच्या प्राचीन इतिहासावर अधिक प्रकाश पडू शकतो.

### छत्रपती महाविद्यालयात 'स्टार्टअप'चे दुसरे पुष्प; विद्यार्थ्यांना दिला उद्योजकतेचा कानमंत्र



**● श्रीगोंदा । वीरभूमी -**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्टार्टअप' व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प उत्साहात संपन्न झाले. यावेळी मुंबईतील श्रीगणेशा इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक संजय पाटील आणि आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक चॅम्पियन लोकेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकता, जिद्द, शिस्त आणि ध्येयपूर्तीचे महत्त्व पटवून दिले.

संजय पाटील यांनी दहावीनंतर आयटीआयचे शिक्षण घेत नोकरीपासून यशस्वी उद्योजक होण्यापर्यंतचा संघर्षमय प्रवास उलगडला. प्रतिकूल परिस्थितीतही सातत्य, समर्पण आणि कामातील परिपूर्णतेच्या जोरावर यश मिळवता येते, असे त्यांनी सांगितले.

लोकेश पाटील यांनी टाटा मुंबई मॅरेथॉनपासून दक्षिण आफ्रिकेतील ९० किलोमीटरच्या मॅरेथॉनपर्यंतचा प्रवास सांगत विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी शिक्षणाचा उपयोग जीवन घडविण्यासाठी करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. प्रास्ताविक व अतिथी परिचय डॉ. ज्ञानेश्वर कर्पे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. बाळासाहेब महारनूर, डॉ. प्रमोद परदेशी, डॉ. मुकुंद भोस, डॉ. विलास सुद्रिक, प्रा. सागर रोडे, प्रा. जानकु महारनूर यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. कर्पे यांनी केले, तर आभार डॉ. परदेशी यांनी मानले.

### वारीतील शिबिरात २१३ विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

**● कोपरगाव । वीरभूमी-**

तालुक्यातील वारी येथील राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित मोफत मदत सेवा केंद्राच्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त टेके पाटील ट्रस्टचे अध्यक्ष पत्रकार रोहित टेके यांच्या संकल्पनेतून इंडियन डेंटल असोसिएशन कोपरगाव शिर्डी-शाखा, यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी वारी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या २१३ विद्यार्थ्यांची दुसऱ्या टप्प्यातील दंत तपासणी इंडियन डेंटल असोसिएशनचे तंत्र रोग तज्ज्ञ डॉ. अंकित कृष्णानी व डॉ. दिपाली चौधरी यांनी केली. तसेच मौखिक आरोग्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



पहिल्या टप्प्यात रामेश्वर विद्यालयातील पाचवी ते दहावी पर्यंतच्या १८० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी ८ सप्टेंबरला करण्यात आली होती. दोन्ही शाळा मिळून ३९३ विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करण्यात आली आहे.

यापप्रसंगी टेके पाटील ट्रस्टचे अध्यक्ष पत्रकार रोहित टेके, कोपरगाव पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी शबाना शेख, केंद्रप्रमुख लक्ष्मण पंडोरे, केंद्रप्रमुख अजित मुनतोडे, माजी ग्रा.पं.सदस्य गोरख टेके, एसएमसी सदस्य सुरज टेके, वारी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत माळी, रामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक शरीफ शेख, दहिगाव बोलका शाळेचे मुख्याध्यापक चांगदेव ढेपले, सडे शाळेचे मुख्याध्यापक अमोल थिटे, जयसिंग बनगैय्या, अनिल निकम, वारी केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, वारी शाळेचे शिक्षक सुधाकर आंबिलवादे, गोरक्षनाथ साबळे, भागा जाधव, दत्तात्रय चव्हाण, प्रवीण आहेर, अरुण पवार, शर्मिला विधाते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रवीण अहिरे यांनी मानले.

# पाथर्डीत वाहतूक पोलिसांची धडक वाहन तपासणी मोहीम

## शहरातील प्रमुख चौकांत अचानक कारवाई | सुमारे २० वाहनांवर दंडात्मक कारवाई, वाहनचालकांची उडाली धांदल

**● पाथर्डी । वीरभूमी-**

पाथर्डी शहरातील वाहतूक शिस्त अधिक कडक करण्याच्या दृष्टीने पाथर्डी पोलिसांच्या वाहतूक शाखेने शुक्रवारी शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांवर धडक वाहन तपासणी मोहीम राबविली. अचानक करण्यात आलेल्या या कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये काही काळ धांदल उडाली. या मोहिमेत विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सुमारे २० वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

पाथर्डी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांच्या आदेशानुसार वाहतूक पोलीस कर्मचारी शिवाजी नागरे यांच्या पथकाने ही विशेष मोहीम राबविली. कोरडगाव चौक, शेवगाव रोड, कोरडगाव रोड, नाईक चौक तसेच जुने एसटी स्टँड परिसर आदी ठिकाणी वाहनांची कसून तपासणी करण्यात आली.

या तपासणीदरम्यान विना क्रमांकाची वाहने, एचएसआरपी नंबर प्लेट, वाहनचालक परवाना, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, ट्रिपल सीट तसेच अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन यांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

वाहन तपासणी मोहिमेचा केवळ वाहतूक नियमांपुरता मर्यादित न राहता गुन्हेगारीला आळा घालण्यासाठीही उपयोग होऊ शकतो, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विना क्रमांकाची किंवा संशयास्पद वाहने, चोरीच्या मोटारसायकली, तसेच अवैध व्यवसाय अथवा अन्य गुन्ह्यांसाठी वापरली जाणारी वाहने यांची तपासणी करण्यास अशा मोहिमांमुळे पोलिसांना मदत होऊ शकते.

पाथर्डी शहरातील वाढती वाहनांची संख्या, रस्त्यालगत होणारे अनधिकृत पार्किंग आणि प्रमुख चौकांमध्ये निर्माण होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता अशा तपासणी मोहिमा नियमितपणे राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सातत्याने कारवाई झाल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, यापुढेही संपूर्ण शहरात नियमितपणे वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांमध्ये चांगलीच धांदल उडाली, तर पोलिसांच्या या धडक मोहिमेचे शहरवासीयांनी स्वागत केले आहे.



# SPOT NEWS

## अहिल्यानगरमध्ये रविवारी 'इंडिया खेलो फुटबॉल'ची विशेष निवड चाचणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

फुटबॉल खेळाला प्रोत्साहन देत युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळावी, यासाठी 'इंडिया खेलो फुटबॉल' अंतर्गत अहिल्यानगरमध्ये रविवार दि. ४ ऑक्टोबर रोजी विशेष निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या माध्यमातून ही निवड चाचणी घेण्यात येणार असून, १५ व १७ वर्षांखालील मुलांसह १७ वर्षांखालील मुलींना यात सहभागी होता येणार आहे. या निवड चाचणीतून गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या खेळाडूंना पुढील टप्प्यातील 'इंडिया खेलो फुटबॉल' प्री-फायनल स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. तसेच पुढे दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय फायनल स्पर्धेत खेळण्याची संधीही निवड झालेल्या खेळाडूंना मिळणार असल्याची माहिती नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांनी दिली. अहिल्यानगरमध्ये फुटबॉलच्या प्रसारासाठी तसेच स्थानिक खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लब सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. क्लब हा 'इंडिया खेलो फुटबॉल' उपक्रमाचा विभागीय पार्टनर असून, या माध्यमातून नगरमधील युवा फुटबॉलपटूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय फुटबॉलचा दर्जा उंचावण्यासाठी देशभरातील २० हून अधिक शहरांमध्ये निवड चाचण्या घेण्यात येत आहेत. या उपक्रमामध्ये अहिल्यानगरचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नगर व परिसरातील युवा फुटबॉल खेळाडूंसाठी ही निवड चाचणी महत्त्वाची संधी ठरणार आहे. अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या निवड चाचणीत १७ वर्षांखालील मुले, १५ वर्षांखालील मुले तसेच १७ वर्षांखालील मुली सहभागी होऊ शकणार आहेत. सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आपल्या खेळातील कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार असून, निवड प्रक्रियेतून पुढील स्तरासाठी पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे. ही निवड चाचणी रविवारी अशोक भाऊसाहेब फिरोदिया स्कूलच्या फुटबॉल मैदानावर सकाळी ८ वाजता आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यानगर व परिसरातील इच्छुक युवा फुटबॉलपटूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

## शहरात रंगले उर्दू काव्यसंमेलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

संस्था अदब-ए-इस्लामी, अहमदनगर शाखेच्या वतीने शहरातील हातमपुरा येथील जमाअत-ए-इस्लामी हिंदच्या कार्यालयात उर्दू काव्यसंमेलन उत्साहात पार पडले. या साहित्यिक मैफलीत शहरातील नामवंत उर्दू शायरांनी आपला निवडक काव्यसंग्रह सादर केला. उपस्थित रसिकांनी शायरांच्या काव्याला उत्स्फूर्त दाद देत कार्यक्रमाचा आनंद घेतला. या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक व कवी प्रा. नदीम बीजापुरी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्था अदब-ए-इस्लामीचे नाझिम-ए-अदबियात, तखलीक व तहकीक जनाब मुनव्वर हुसेन यांनी शायरीने करुन उपस्थितांचे लक्ष वेधले. कार्यक्रमात प्रा. नदीम बीजापुरी, आसिफ अहमद आसिफ, बिलाल अहमदनगरी, मकबूल अहमदनगरी, मुश्ताक अहमद मुश्ताक सर आणि मुनव्वर हुसेन अहमदनगरी यांनी आपले काव्य सादर केले. त्यांच्या काव्यात समकालीन जाणीव, नैतिक मूल्ये, सामाजिक भान तसेच उर्दू भाषा व साहित्याची समृद्धता आणि सौंदर्य प्रकर्षाने जाणवले. उपस्थित श्रोत्यांनी सर्व शायरांच्या काव्याला उत्स्फूर्तपणे टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# जातीयवाचक ठरावाविरोधात पारनेर पोलिस ठाण्यासमोर धरणे

### रोकडे प्रकरणी कारवाईची मागणी । विविध सामाजिक संघटनांचा आंदोलनात सहभाग

**● पारनेर । वीरभूमी –**

दैठणे गुंजाळ विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाने कर्मचारी सुरेश मालबा रोकडे यांच्याबाबत जातीयवाचक ठराव केल्याचा आरोप करत विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी शुक्रवारी पारनेर पोलिस ठाण्यासमोर जोरदार धरणे आंदोलन केले. संबंधित संचालक मंडळासह प्रकरणात दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.



पारनेर पोलिस ठाण्यासमोर सकाळी ११ वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, रिपब्लिकन सेना, भीमशक्ती संघटना आणि आरपीआय युवा आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर जातीय भेदभावाचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, सुरेश मालबा रोकडे तसेच त्यांच्या समाजाचा सार्वजनिकरित्या अपमान व अवहेलना करणारा ठराव घेण्यात आला आहे. रोकडे यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी आवश्यक कागदपत्रे देण्यास संचालक मंडळाने नकार दिल्याचा आरोपही करण्यात आला. त्यामुळे संबंधित संचालक मंडळावर नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करून ते बरखास्त करावे, अशी मागणी आंदोलकांनी केली.

यावेळी आंदोलकांच्या शिष्टमंडळाने पारनेर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. संबंधित प्रकरणाबाबत पोलिस अधीक्षकांशी तातडीने चर्चा करून कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिवटे यांनी दिल्याचे आंदोलकांनी सांगितले. या निवेदनावर राजेंद्र करंदीकर, बाळासाहेब पातारे, हिरामण सोनवणे, किरण सोनवणे, अतुल भालेराव, काकासाहेब गुंजाळ, दादाभाऊ पटेकर, प्रल्हाद शिंदे, गणेश मगर, प्रदीप नगरे, अविनाश देशमुख, अजय साळवे, अशोक गुंजाळ, अंबादास जाधव, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### चौकशी करुनच पुढील कारवाई

■ संबंधितांचा ठरावाचा मजकूर उपलब्ध कागदपत्रे आणि प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून पोलिसांकडून चौकशी करण्यात येणार आहे. चौकशीत तथ्य समोर आल्यानंतर कायद्यानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## अशोक सहकारी बँकेतील ४० हजार ठेवीदारांच्या ३८० कोटींच्या ठेवी अडकल्या

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्बंध घातलेल्या अशोक सहकारी बँकेतील तब्बल ४० हजार ठेवीदारांच्या सुमारे ३८० कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत. त्याचबरोबर बँकेसमोर ३७९ कोटी रुपयांच्या कर्जवसुलीचे आव्हान निर्माण झाले आहे. कर्जवसुलीसाठी दाखले मिळवून कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याची माहिती बँकेचे प्रशासक तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी दिली.

बँकेत पाच लाख रुपयांपर्यंत ठेवी असलेल्या ठेवीदारांची संख्या ३९ हजार ८५० असून, त्यांच्या ठेवींची एकूण रक्कम २४९ कोटी रुपये आहे. ठेवी विमा संरक्षण योजनेअंतर्गत (ऊखउऋड) पाच लाख रुपयांपेक्षा कमी ठेवी असलेल्या ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळण्यासाठी प्रशासक सुरवसे यांनी उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्यासाठी ठेवीदारांनी अर्ज दाखल करून 'केवायसी'ची पूर्तता करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

'डीआयसीजीसी'चा २४ लाख ७२ हजार रुपयांचा हप्ता बँकेने जमा केला आहे. सुमारे २१ हजार खातेदारांची 'केवायसी' प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. यापैकी सुमारे १६ हजार खातेदारांच्या खात्यात ५०० रुपयांपेक्षा कमी रक्कम शिल्लक आहे. उर्वरित सुमारे पाच हजार खातेदारांच्या खात्यात त्यापेक्षा अधिक रक्कम असून, त्यांच्या 'केवायसी' पूर्ततेची प्रक्रिया बँकेने सुरू केली आहे.

बँकेच्या थकबाकीचे प्रमाण २८ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याने तसेच व्यवस्थापनातील गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने सुमारे एक महिन्यापूर्वी अशोक सहकारी बँकेवर निर्बंध लागू केले. ही बँक सनदी लेखापाल तथा श्रीरामपूरचे माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या अधिपत्याखालील आहे.

रिझर्व्ह बँकेने अशोक सहकारी बँकेला नवीन कर्ज वितरण तसेच नवीन ठेवी स्वीकारण्यास मनाई केली आहे. तसेच कोणतेही आर्थिक व्यवहार करण्यास आणि मालमत्ता हस्तांतरित करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. पाच हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. बँकेची सर्व खाती सील करण्यात आली आहेत.

या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी बँकेची सर्वसाधारण वार्षिक सभा प्रशासक मंगेश सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली नगर येथे झाली. या सभेत प्रशासकांनी कर्जवसुलीसाठी सुरू केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच पाच लाख रुपयांपेक्षा कमी ठेवी असलेल्या खातेदारांनी 'केवायसी'ची पूर्तता करावी, असे आवाहन केले.

कर्जवसुलीसाठी बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके नियुक्त करण्यात आली आहेत. कर्जवसुलीसाठी दाखले मिळवून कर्जदारांच्या मालमत्ता जप्त करणे आणि त्यानंतर त्यांचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे प्रशासक सुरवसे यांनी सांगितले.

## गांधी जयंतीनिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयात कथाकथन कार्यक्रम



**● पाथर्डी । वीरभूमी –**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शहरातील बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्तर +२ विभागांतर्गत कथाकथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून तालुक्यातील प्रसिद्ध कवी, कथा कथनकार संदीप काळे उपस्थित होते. त्यांनी उत्कृष्ट कथेच्या माध्यमातून मंत्रमुग्ध करत आजच्या तंत्रज्ञानाचं युगात पुस्तकाचे व वाचनाचे महत्त्व स्पष्ट करत वाचन संस्कृती रुजवा, वाचनाने माणसाच्या व्यक्तिमत्वाला आकार मिळतो व जीवनात यशस्वी होण्यासाठी वाचन वाढवा तसेच महाविद्यालयात असलेला हजारो पुस्तकांचा समृद्ध ज्ञानरूपी साठा असून त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असा मौलिक संदेश दिला. तसेच आपल्या स्वरचित कविताही सादर केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बी. ए. चौरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत आपण जीवनात महात्मा गांधीजींच्या विचारांचे अनुकरण केले पाहिजे तसेच नेहमी सत्य व अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करत जीवनात यश संपादन करा असा संदेश विद्यार्थ्यांना देत बहुमोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग समन्वयक प्रा. सुरेखा चेमटे तर आभार प्रा. प्रणिता भावसार यांनी मानले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व स्टाफ व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी जलद चालणे स्पर्धा उत्साहात संपन्न

### 'आनंदी जीवनाची गुरुकिल्ली' विषयावर अशोकजी देशमुख यांचे मार्गदर्शन; विजेत्यांचा सन्मान

**● कोपरगाव । वीरभूमी –**

आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त समता पतसंस्था, ज्येष्ठ नागरिक सेवा मंच आणि श्रेष्ठ नागरिक मित्र मंडळ (निवारा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्येष्ठ नागरिकांसाठी जलद चालणे स्पर्धा, सभासद स्नेहमेळावा आणि आनंदी जीवनावर व्याख्यान समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाले. समता पतसंस्था ते कलश मंगल कार्यालय या मार्गावर झालेल्या जलद चालणे स्पर्धेचे उद्घाटन कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत, प्रांताधिकारी धनंजय बांगर आणि कोपरगाव शहर पोलीस स्टेशनचे एपीआय दीपक रोठे, कोपरगाव ज्येष्ठ नागरिक सेवा मंच अध्यक्षा सौ.सुधाभाभी ठोळे, कार्याध्यक्ष विजय बंब यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत ९३ वर्षीय चंद्रकला रोहोम या आजींनी देखील सहभाग नोंदविला.

तहसीलदार महेश सावंत यांनी ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची काळजी घेत नियमित व्यायाम आणि चालण्याला जीवन शैलीचा भाग बनवावा, असे सांगितले. अशा उपक्रमांमुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साह निर्माण होऊन त्यांचा सामाजिक सहभाग वाढतो, असे त्यांनी नमूद केले.

प्रांताधिकारी धनंजय बांगर यांनी ज्येष्ठ नागरिकांचा अनुभव आणि मार्गदर्शन समाजासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. ज्येष्ठांनी सकारात्मक विचारांसह सामाजिक जीवनात सक्रिय राहून आनंदी जीवनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. एपीआय दीपक रोठे यांनी ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्यासोबतच सुरक्षिततेचीही काळजी घ्यावी, असे सांगितले. कुटुंबातील सर्व पिढ्यांनी ज्येष्ठांना वेळ, सन्मान आणि आपुलकी देऊन त्यांच्या अनुभवाचा आदर करावा, असे त्यांनी नमूद केले.

> ज्येष्ठ नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. समता पतसंस्थेच्या या उपक्रमातून आरोग्यदायी, आनंदी आणि तणावमुक्त जीवनाचा संदेश देण्यात आला.
>
> **– काका कोयटे**

यानंतर कलश मंगल कार्यालय येथे ज्येष्ठ नागरिक सेवा मंचचे डॉ. विलास आचारी यांच्या प्रास्ताविकाने कार्यक्रमास सुरुवात झाली. सुप्रसिद्ध व्याख्याते अशोकजी देशमुख यांनी 'ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन कसे जगावे व सर्व वयोगटातील नातेवाईकांनी हसत-खेळत तणावमुक्त जीवनाचा आनंद कसा घ्यावा ?' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी १ तास सभागृहाला खिळवून ठेवले होते. सभागृहात एक तास हशा पिकला होता. त्यानंतर उपस्थित जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन असून विविध गीतांवर ठेका धरायला देखील लावला.



जलद चालणे स्पर्धेच्या ६० ते ७० वर्षे पुरुष गटात रामदास वाकचौरे प्रथम, ओमप्रकाश भावसार द्वितीय, नंदू राजगुरू तृतीय, महिला गटात उषाताई कवडे प्रथम, कमल गायकवाड द्वितीय, हिराबाई झावरे तृतीय ठरल्या. ७० ते ८० वर्षे पुरुष गटात दिनकर झावरे प्रथम, वसंतराव देशमुख द्वितीय, सदाशिव चौधरी तृतीय, तर महिला गटात चंद्रकला सावंत-सरकर प्रथम, हर्षदा पटवर्धन द्वितीय, रजनी नलगे तृतीय ठरल्या. ८० वर्षांवरील गटात घैसास सर प्रथम, दत्तात्रय निकम द्वितीय, शिवाजी सोनवणे तृतीय ठरले. सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत ९९ ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला होता.

या वेळी समता पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरविंदभाई पटेल, कोपरगाव ज्येष्ठ नागरिक सेवा मंच उपाध्यक्ष दत्तात्रय कंगले, सचिव उत्तमभाई शहा तसेच श्रेष्ठ नागरिक मित्र मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती पुष्पाताई सुतार, उद्योजक कैलास ठोळे, व्यापारी महासंघ कार्याध्यक्ष सुधीर डागा, रजनी गुजराती, शैलेजा रोहोम, जनरल मॅनेजर सचिन भट्टड आदींसह स्पर्धक, हितचिंतक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय गोरे यांनी केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# शेवगावला हक्काचे पाणी दिल्यानंतरच पाथर्डीसाठी नवीन पाणी योजना

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । शेवगाव येथे टंचाई आढावा बैठक । ताजनापूर टप्पा-३ साठी ५०० कोटींची घोषणा

**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव तालुक्याला हक्काचे पाणी दिल्यानंतरच पाथर्डीसाठी नवीन पाणी योजना राबविण्यात येईल. शेवगावचे हक्काचे पाणी कोणत्याही परिस्थितीत अन्यत्र वळविले जाणार नाही, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ताजनापूर टप्पा क्रमांक तीनसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यापूर्वी सर्वेक्षणासाठी जलसंपदा विभागाने एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची घोषणाही त्यांनी केली.

शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील तीव्र दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (ता. २) शेवगाव येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दुष्काळी परिस्थितीत निष्काळजीपणा न करता युद्धपातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या. जनतेला दिलासा देण्यासाठी सर्व यंत्रणांनी तत्परता दाखवावी. कोणत्याही अधिकाऱ्याने मुख्यालय सोडू नये; अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

**टँकरच्या पाण्यावर फिल्टर प्रक्रिया**

टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्यावर फिल्टर प्रक्रिया करून नागरिकांना स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. नागरिकांना पिण्याचे पाणी तसेच जनावरांसाठी पाणी व चारा उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

पाथर्डी तालुक्यातील १३७ गावांपैकी ५३ गावांमध्ये सध्या ६८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती तहसीलदार उद्धव नाईक यांनी दिली. आमदार मोनिका राजळे यांनी शेवगाव-पाथर्डी तालुक्यात सध्या ८२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, आगामी काळात टंचाई आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

**ताजनापूरच्या पुढील टप्प्यांना गती**

ताजनापूर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांना गती देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. ताजनापूर टप्पा क्रमांक एकमधील आठ गावांना पाणीपुरवठ्यासाठी ग्रामसभांचे ठराव घेण्यात येणार आहेत. टप्पा क्रमांक दोनमधून १३ गावांना शेतीसाठी पाणी देण्याचा मानस आहे. या १३ गावांसाठी सुमारे अडीचशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, सर्वेक्षणासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.

ताजनापूर प्रकल्पाबाबत संभ्रम निर्माण करण्याचे काम झाले. त्यामुळे टप्पा क्रमांक तीन उभारण्याचा जलसंपदा मंत्र्यांनी घेतलेला निर्णय महत्त्वाचा असून, हे काम दोन वर्षांत पूर्ण होईल, अशी अपेक्षाही राजळे यांनी व्यक्त केली.

**'शेवगावचे पाणी पाथर्डीला वळविले जाणार नाही'**

शेवगावचे हक्काचे पाणी कोणत्याही परिस्थितीत अन्यत्र वळविले जाणार नाही, असे स्पष्ट करत विखे पाटील म्हणाले, मी स्वतः जलसंपदा मंत्री असूनही शेवगावकरांचा माझ्यावर विश्वास नाही का? शेवगाव तालुक्याला त्याचा न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल.

बैठकीत जलजीवन मिशनच्या कामांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. निकृष्ट अथवा बोगस कामे आढळल्यास संबंधित ठेकेदारांकडून वसुली करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीपुरवठा योजनांच्या पाइपलाइनची तोडफोड करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही देण्यात आले.

आमदार मोनिका राजळे यांनी पशुधनाची नोंद झालेली नसल्याने



तातडीने पशुगणना करून त्याचा आढावा घेण्याची मागणी केली. परिस्थिती बिकट असून, त्यावर उपाययोजनांसाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शेवगावचे हक्काचे पाणी पाथर्डीला पळविले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**सरसकट पंचनाम्यांच्या सूचना**

दुष्काळामुळे ऊस, फळबागा आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे वस्तुनिष्ठ व सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना कृषी विभागाला देण्यात आल्या.

बैठकीत शेतकरी व ग्रामस्थांनी पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाणी, शेततळे आणि बंधाऱ्यांतील गाळ काढणे, तसेच जायकवाडी धरणातून शेवगाव व पाथर्डी तालुक्याच्या पूर्व भागाला शाश्वत पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागण्या केल्या. ग्रामसेवक व तलाठी मुख्यालयी राहत नसल्याच्या तक्रारीही नागरिकांनी मांडल्या. विविध प्रश्नांवरून बैठकीत काहीवेळा तीव्र चर्चा व खडाजंगी झाली.

या बैठकीस विनायक देशमुख, अरुण मुंडे, महेश फलके, संजय टाकळकर, संतोष केसभट, धनंजय बडे, ताजनापूर प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील, मुख्य अभियंता गणेश हासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे, उपजिल्हाधिकारी हिंगे, जलसंपदा विभागाच्या सुनंदा जगताप, सायली पाटील, प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाश दहाडदे, पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, धस, उपअभियंता कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, मुख्याधिकारी संतोष लांडगे, विजया घाडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन राजीव सुरवसे यांनी केले.

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत श्री विवेकानंद विद्यामंदिरला अजिंक्यपद



**● पाथर्डी । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय व पाथर्डी तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा फ्लाइंग बर्ड स्कूल पाथर्डी येथे नुकत्याच संपन्न झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन प्रांताधिकारी प्रसाद मते, नगराध्यक्ष अभय आव्हाड, मृत्युंजय गर्जे,दीपक देशमुख, पाथर्डी तालुका क्रीडा पदाधिकारी तसेच पाथर्डी तालुक्यातील सर्व क्रीडाशिक्षक यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या स्पर्धेत पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी मधील १४ वर्षे वयोगट मुले व १७ वर्षे वयोगट मुले या गटातील खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकावून अजिंक्यपद पटकाविले. या दोन्ही संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. विद्यालयातील दोन्ही संघ पाथर्डी तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. १४ वर्षे वयोगट मुली,१७ वर्षे वयोगट मुली व १९ वर्षे वयोगट मुले या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेत एकूण २८ संघाने सहभाग नोंदविला.

यशस्वी संघातील खेळाडूंचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पार्थ नगरीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, विश्वस्त कुणाल आव्हाड, मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, पर्यवेक्षक संपत घारे, पालक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक सतीश डोळे, गौरव दाणे, प्रमोद हंडाळ, भैया थोरात, मनोज ढाकणे, कार्तिक कराड यांचे मार्गदर्शन लाभले.

# ४२ वर्षांनंतर शाळेत परतला अन् दिली एक लाखांची भेट!

## रयतच्या विकास आराखड्याची दमदार सुरुवात । माजी विद्यार्थी विक्रम वाबळे यांच्याकडून इंटरक्टिव्ह पॅनेल

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

तब्बल ४२ वर्षांनंतर शाळेत पुनरागमन... जुन्या आठवणींना उजाळा आणि त्याच शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक लाख रुपयांचे योगदान! माजी विद्यार्थ्याच्या या कृतज्ञतेतून रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव येथे शाळा विकासाच्या नव्या पर्वाला दमदार सुरुवात झाली. माजी विद्यार्थी विक्रम वाबळे यांनी विद्यालयाला एक लाख रुपये किमतीचे इंटरक्टिव्ह पॅनेल भेट देत शिक्षणाच्या आधुनिक वाटचालीला हातभार लावला.



महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांनी स्वच्छतेची शपथ घेत 'स्वच्छ शाळा-सुंदर शाळा' हा संकल्प प्रत्यक्षात उतरवण्याचा निर्धार केला.

शिक्षक शंकर यदलोड यांनी गांधीजी आणि शास्त्रीजी यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत विद्यार्थ्यांना विचारांची प्रेरणा दिली. विद्यालयातील स्वच्छता दूत म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सोहम जाधव याचा सन्मान करण्यात आला. तर राजवीर ऋषिकेश वाबळे याने वाढदिवसानिमित्त ग्रंथालयाला पुस्तके भेट देत वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिले.

सन १९८५ च्या बॅचचे विद्यार्थी विक्रम वाबळे मूळचे म्हातारपिंपरी व सध्या मुंबईत उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. तब्बल चार दशकांनंतर शाळेत आलेल्या वाबळे यांनी शाळेच्या आठवणींना उजाळा देतानाच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेता यावे, यासाठी इंटरक्टिव्ह पॅनेलची भेट दिली. भविष्यातही विद्यालयाच्या विकासासाठी सहकार्य करण्याची तयारी त्यांनी व्यक्त केली.

रयत शिक्षण संस्थेच्या शाळा विकास आराखड्याची गांधी जयंतीपासून सुरुवात करण्यात आली आहे. या विकासपर्वात माजी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविंद्रराव महाडिक यांनी केले. गांधीजी आणि शास्त्रीजींच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी जीवनात जोपासावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्याध्यापक हौसराव दांगडे, पर्यवेक्षक विलास सुलाखे, मीनाक्षी कदम, राजेंद्र शेळके, विकास चव्हाण यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुजाता डाके व प्रणव नलगे यांनी केले. आभार मुख्याध्यापक हौसराव दांगडे यांनी मानले.

माजी विद्यार्थ्यांच्या कृतज्ञतेतून मिळालेली ही भेट केवळ शैक्षणिक साहित्याची नसून, शाळेच्या विकासासाठी जुन्या आणि नव्या पिढीला जोडणाऱ्या स्नेहबंधाची ठरली.

# जि.प. शाळांतील विद्यार्थ्यांनी आमदार राजळेंचा चेंडू त्यांच्याच कोर्टात टोलवला!

## मोबाईलच्या वापराबाबत प्रश्न विचारताच विद्यार्थ्यांची हजरजबाबी उत्तरे । 'सेवा संकल्प अभियानात' ८ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना योजनांचा लाभ

**● पाथर्डी । वीरभूमी–**

मुलांनो, शाळेत पाण्याच्या बाटलीतून पिऊन उरलेले पाणी काय करता? असा प्रश्न आमदार मोनिका राजळे यांनी विद्यार्थ्यांना विचारताच, आम्ही ते झाडांना टाकतो, असे चटकन उत्तर मिळाले. त्यानंतर तुम्ही मोबाईल पाहता का? या प्रश्नावरही क्षणात नाही असे उत्तर आले. मात्र, आई-वडील मोबाईल पाहत असतील ना? असे विचारताच विद्यार्थ्यांनी सावध होत उत्तर देण्याऐवजी शांत बसणे पसंत केले. विद्यार्थ्यांच्या या हजरजबाबीपणामुळे आमदार राजळेंसह उपस्थितांमध्ये हशा पिकला आणि विद्यार्थ्यांच्या समयसूचकतेचे कौतुक करण्यात आले.

तहसील कार्यालयाच्या पुढाकाराने तालुक्यातील सर्व शासकीय विभाग, महिला व बालकल्याण विभाग, बचत गट आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त सहभागातून 'सेवा संकल्प अभियान' कार्यक्रम आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून लाभार्थ्यांना थेट लाभ देण्याचा संकल्प या अभियानातून करण्यात आला. गेल्या काही दिवसांत आठ हजारांहून अधिक लाभार्थ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला आहे.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत हे अभियान सर्वत्र राबविण्यात येत असून, शासनाचे सर्व विभाग संयुक्तपणे त्यासाठी काम करणार आहेत. शिक्षण विभागाने केलेल्या उत्तम सादरीकरणामुळे कार्यक्रमात विशेष रंगत आली.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार मोनिका राजळे म्हणाल्या की, सध्याची पाणीटंचाई अत्यंत भीषण असून, त्याच्या झळा पुढील वर्षापर्यंत बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याच्या प्रत्येक थेंबाची बचत करावी. पाण्याची बचत हीच निर्मिती समजा, असे आवाहन त्यांनी केले.

भांडी घासणे, कपडे धुणे यासाठी अत्यंत मोजक्या पाण्याचा वापर करावा आणि गाड्या धुणे बंद करावे. पाणीबचत, पर्यावरणाचे रक्षण आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करून आदर्श जीवनपद्धती अंगीकारावी, असेही त्यांनी सांगितले.

तालुक्यात प्रशासनाचे काम अत्यंत उत्तम पद्धतीने सुरू असून, महिनाभरातील उल्लेखनीय कामगिरीचा माहितीपट तयार करून तो पंतप्रधान कार्यालयाला पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल. स्थानिक पातळीवर उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागाचा गौरव करण्यात येईल, असेही राजळे यांनी सांगितले.



मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. कुटुंब व्यवस्था आणि समाजव्यवस्था उध्वस्त होण्यापूर्वी प्रत्येकाने आठवड्यातून एक दिवस 'मोबाईलचा उपवास' करावा. स्क्रीन टाईम कमी करून घराघरांत 'संवाद टाईम' वाढवावा, असे आवाहन आमदार राजळे यांनी केले.

कार्यक्रमास प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार किशोर सानप, नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर, पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, नंदकुमार शेळके, प्रतीक नांगरे, मनीषा उदमले, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, मनीषा घुले, धनंजय बडे, गटशिक्षणाधिकारी सचिन राख, विस्तार अधिकारी रामनाथ कराड यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि बचत गट चळवळीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी केले. सूत्रसंचालन महादेव कौसे व आरिफ बेग यांनी केले, तर आभार मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी मानले.